# मिठी नदीखालून मेट्रो जाते तेव्हा...



(छाया : दीपक साळवी)



। नम्रता सावंत-कदम

**मुंबई : मुंबईच्या गर्भात दडलंय काय? याचे उत्तर येणाऱ्या काही दिवसांमध्ये मेट्रोच्या स्वरूपात पाहायला मिळेल. एमएमआरसीएलने आयोजित केलेल्या मेट्रो स्थानकांच्या भेटीदरम्यान मुंबईकरांचा सुखाचा प्रवास भूगर्भात दडल्याचे चित्र समोर आले.**

आरेतील वृक्षतोड वाद वगळता सुरुवातीपासूनच मेट्रो मार्गिकांच्या कामकाजादरम्यान रस्ते खोदण्यासाठीचे ड्रिलिंग, काही भागात इमारतींना बसणारे हादरे, कामकाजादरम्यानची वाहतूक कोंडी, ध्वनीप्रदूषण याच्याबरोबरच विविध आव्हानांना सामोरे जात एमएमआरसीएलने मेट्रो ३ या भुयारी मार्गाचे काम पूर्णत्वाकडे आणले आहे. अत्यंत काटेकोर नियोजन, प्रचंड कार्यकुशल कामगारांची फौज आणि सुरक्षिततेच्या नियमांचे पालन यामुळे कमी अपघाताचे ध्येय साध्य केले आहे.

बीकेसी हे महाराष्ट्रातील नदीखालचे पहिले भुयारी मेट्रो स्टेशन असून मेट्रो ३ मार्गिकेदरम्यानचे सर्वात लांब स्थानक आहे. मुंबईत पश्चिम उपनगरात वाहणाऱ्या आणि ऐन पावसाळ्यात आपले रौद्ररूप दाखवत संपूर्ण मुंबईला ठप्प करणाऱ्या मिठी नदीखालून भुयार खणून हे मेट्रो स्थानक तयार करण्यात आले आहे. येत्या काही दिवसात हे स्थानक तयार होईल आणि मुंबईच्या भौगोलिक, सामाजिक आणि सांकृतिक इतिहासात अद्ययावत तंत्रज्ञानाच्या मदतीने नवा अध्याय लिहिला जाईल. मुंबईच्या भूगर्भात विशेषतः नदीखालील मेट्रो मार्गिकेचे काम पाहताना धाकधूक वाढतेच, मात्र मुंबई मेट्रो रेल महामंडळाने सुरक्षिततेचे घेतलेले उपाय कामकाजाबाबतची विश्वासार्हता वाढवतात. संपूर्ण भुयारी मार्गात प्रवेश करताना श्वास घेण्याच्या आणि सोडण्याच्या पद्धती, पर्यायी उपकरणाच्या वापराच्या पद्धतीची माहिती भुयारी मार्गातील आव्हानांची प्रचिती देतात. भुयारात उद्‌भवणाऱ्या विविध गॅसमुळे कुणालाही त्रास होऊ नये तसेच डोळ्यांमध्ये धूळ जाऊ नये यासाठी दिलेली उपकरणे महत्त्वाची ठरतात.

महाराष्ट्रातील नदीखालून जाणारी पहिली मेट्रो म्हणून कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. बीकेसी हा परिसर कोणत्याही उपनगरीय रेल्वेने जोडलेला नाही. त्यामुळेच अर्थ प्रेशर बॅलन्स पद्धतीने व काही ठिकाणी एनएटीएम पद्धतीने नदीखालील भुयारीकरण करण्यात आले आहे. टॉप हेडिंग, बेंचिंग, व इन्व्हर्ट या तीन भागात भुयारीकरण करण्यात आले आहे. गर्दीच्या वेळी गाड्यांचे जलद संचालन होण्यासाठी आणि तांत्रिक बिघाड झाल्यास मिठी नदीखालूनच पर्यायी ट्रॅकची सुविधा करण्यात आली आहे. पॅकेज ५ अंतर्गत बीकेसीसह धारावी, विद्यानगरी व सांताक्रुझ स्थानकांचा समावेश असून या पॅकेजचे ८९ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे.

## बीकेसी स्थानकाचे वैशिष्ट्य

*बीकेसी स्थानक १८ मीटर खोल असून स्थानकाची लांबी ४७४ मीटर आहे. ३ बोगदे बांधण्यात येणार आहेत तर २ बोगदे टनेल बोअरिंग मशीनच्या माध्यमातून आहेत. एक बोगदा न्यू ऑस्ट्रिया टनेल पद्धतीच्या माध्यमातून आहे. दोन स्टेबलिंग लाईन्स मिठी नदीखालील बाजूस आहेत. एक उत्तरेकडे आणि दुसरी दक्षिणेकडे आहे.*



## मुंबईच्या गर्भात दडलाय सुखाचा प्रवास

*कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेतील पॅकेज १ मधील दक्षिणेकडील सर्वात पहिले स्थानक म्हणजे कफ परेड हे महत्त्वाची व्यापारी केंद्रे, शासकीय इमारती, अधिकाऱ्यांची निवासस्थाने, मच्छीमार कॉलनी अशा निवासी आणि व्यावसायिक क्षेत्रामुळे या पहिल्या स्थानकाला विशेष महत्त्व आहे. कफ परेड स्थानकामध्ये मेट्रोचे ट्रॅक बदलण्याची सोय करण्यात आली आहे, तर दोन्ही बाजूला मेट्रो आणि मध्ये प्लॅटफॉर्म अशा स्वरूपाचे स्थानक तयार करण्यात आले आहे. येत्या सप्टेंबर महिन्यापर्यंत स्थानकाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. जमिनीपासून २२ मीटर खोल, कफ परेड स्थानकाची लांबी ४०० मीटर असून २०० मीटर लांबीचे दोन बोगदे आहेत.*